# महाराष्ट्र शासन
# अधिदान व लेखा कार्यालय

☎ ०२२ - २६५६६३३६
E-mail : pao@mahakosh.in

लेखा कोष भवन, ए विंग
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.


---

**: ई-लिलाव नोटीस :**

अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई कार्यालयातील निर्लेखित केलेले जुने वाहन नोंदणी क्र. MH०२PA३८८८ (टाटा ४०७ कॅश व्हॅन) याची ई-लिलाव प्रध्दतीने विकी करावयाची आहे.

सदर ई-लिलावाबाबत सविस्तर अटी व शर्ती व संपूर्ण माहिती शासनाच्या **eauction.gov.in** या संकेतस्थळावर दिनांक २५.०७.२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

| **ई-लिलाव प्रक्रियेचा दिनांक** | | |
|---|---|---|
| | **दिनांक** | **वेळ** |
| १. निविदा प्रसिध्दीचा दिनांक | २५.०७.२०२३ | सकाळी १०.०० पासून |
| २. निविदा फॉर्म कागदपत्रे सादर करणे / धनाकर्ष स्विकारण्याचा दिनांक | २५.०७.२०२३ | सकाळी १०.०० पासून |
| ३. निविदा फॉर्म कागदपत्रे सादर करणे / धनाकर्ष स्विकारण्याचा शेवटचा दिनांक | ०१.०८.२०२३ | सायंकाळी ५.३० पर्यंत |
| ४. प्राप्त निविदा फॉर्म कागदपत्रे / धनाकर्ष रक्कम मंजूर देण्याची प्रक्रिया सुरु करण्याचा दिनांक | ०२.०८.२०२३ | सकाळी १०.३० पासून |
| ५. प्राप्त निविदा फॉर्म कागदपत्रे / धनाकर्ष रक्कम मंजूरी देण्याचा शेवटचा दिनांक | ०३.०८.२०२३ | सायंकाळी ६.४५ पर्यंत |
| ६. लिलाव सुरु व बंद करण्याचा दिनांक | ०४.०८.२०२३ | सकाळी १०.०० पासून दुपारी ३.०० पर्यंत |

कोणतीही ई-लिलाव बोली अथवा सर्व ई-लिलाव बोली कोणतेही कारण न देता स्विकृत अथवा अस्विकृत करण्याचा तसेच ई-लिलाव याची कार्यवाही कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचा अथवा त्यामध्ये कोणताही फेरबदल/सुधारणा करण्याचा संपुर्ण अधिकार मा. अधिदान व लेखा अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. ज्या संस्थांना ई-लिलावाबाबत या कार्यालयाच्या सर्व अटी व शर्ती मान्य असतील अशाच संस्थांनी ई-लिलावामध्ये भाग घ्यावयाचा आहे.

(विलास गांगुर्डे)
**अधिदान व लेखा अधिकारी**

## ई-लिलाव अटी व शर्ती

१. निर्लेखित केलेले वाहन घेऊन जाण्याची प्रक्रिया (लिलाव) संगणकावर ऑनलाईन पध्दतीने करण्यात येईल. या ई-लिलावा संबंधी सर्व माहिती सूचना इत्यादी ई-लिलाव प्रणालीद्वारे ऑनलाईन (eauction.gov.in) वर प्रसिध्द करण्यात येतील.

२. सदर वाहन अधिदान व लेखा कार्यालय, लेखा व कोष भवन, ए विंग, वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे पूर्व, मुंबई ४०००५१ येथे ठेवण्यात आले आहे. त्यानुसार दिनांक २५.०७.२०२३ ते ०१.०८.२०२३ या कालावधीत दररोज सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत वाहनाची प्रत्यक्ष पाहणी करून जास्तीत जास्त दर नमूद करावेत. वाहनाची सद्यस्थिती पाहिल्याशिवाय लिलावात भाग घेऊ नये अन्यथा नंतर कोणतीही तक्रार अथवा सबब स्विकारली जाणार नाही.

३. ई-लिलाव प्रक्रियेत भाग घेणारी संस्था मुंबई महानगर विकास प्राधिकरण (MMRDA) परिक्षेत्रातील असणे आवश्यक आहे. MMRDA परिक्षेत्राबाहेरील संस्थेने वाहन लिलाव प्रक्रियेत भाग घेतल्यास त्यांचे दरपत्रक स्विकृत केले जाणार नाही.

४. विक्री केलेल्या वाहनाची अंदाजित बोली रक्कम रु. १,००,०००/- इतकी आहे. सदर रकमेवर वाढीव बोली रक्कम रु. १,०००/- च्या पटीत असेल. (वाढीव बोली रकमेत फेरबदल करण्याचे अधिकार या कार्यालयाने राखून ठेवले आहेत.)

५. सदर निविदा नमुना शुल्क रु. १,६००/- इतके आहे. सदर रकमेचा राष्ट्रीयीकृत बँकेचा धनाकर्ष (Demand Draft) ASSISTANT PAY AND ACCOUNTS OFFICER या नावाने दिनांक २५.०७.२०२३ ते ०१.०८.२०२३ पर्यंत वांद्रे येथील या कार्यालयात जमा करावयाचा आहे. सदर शुल्क ना-परतावा असून निविदा फॉर्म eauction.gov.in या संकेतस्थळावरून download करता येईल.

६. इसारा रक्कम (EMD) रु. ८,०००/- इतकी असून सदर रकमेचा राष्ट्रीयीकृत बँकेचा धनाकर्ष (Demand Draft) ASSISTANT PAY AND ACCOUNTS OFFICER या नावाने दिनांक २५.०७.२०२३ ते ०१.०८.२०२३ पर्यंत वांद्रे येथील या कार्यालयात जमा करावयाचा आहे.

७. खालील कागदपत्रे eauction.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २५.०७.२०२३ ते ०१.०८.२०२३ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने upload करणे अनिवार्य आहे.

१. निविदा नमुना प्रपत्र 'अ'
२. आधार कार्ड व पॅनकार्डची प्रत
३. ASSESSMENT YEAR २०२२-२३ किंवा २०२३-२४ चे आयकर विवरणपत्र
४. वस्तु व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र किंवा दुकाने व आस्थापना नोंदणी प्रमाणपत्र (केवळ MMRDA परिक्षेत्रातील)
५. ई-लिलाव अटी व शर्तींच्या प्रतीवर साक्षांकित करण्यात यावे. (सही व शिक्क्यानिशी)

वरील १ ते ७ कागदपत्रांची मुद्रीत स्वरुपातील (print) स्वयंसाक्षांकित (self attested) करून दिनांक ०१.०८.२०२३ पर्यंत वांद्रे येथील कार्यलयात जमा करणे आवश्यक राहील. जर एखादी संस्था कागदपत्रो ऑनलाईन अपलोड करू शकली नाही किंवा eauction वरऑनलाईन लिलाव प्रक्रियेत येऊ शकली नाही. तसेच MMRDA परिक्षेत्राच्या बाहेरील संस्थेने eauction मध्ये भाग घेतल्यास त्यांची निविदा स्विकृत केली जाणार नाही. तसेच निविदा नमुना शुल्क कोणत्याही परिस्थितीत परत केले जाणार नाही व कोणतीही सबब विचारात घेतली जाणार नाही.

८. ज्या संस्थेची / व्यक्तीची लिलाव विक्रीची उच्चतम बोली स्विकारण्यात येईल त्या संस्थेने / व्यक्तीने अधिदान व लेखा कार्यालयाकडे सुरक्षा ठेव म्हणून रु. १०,०००/- या रकमेचा राष्ट्रीयीकृत बँकेचा धनाकर्ष (Demand Draft) ASSISTANT PAY AND ACCOUNTS OFFICER या नावाने कार्यादेश दिल्यापासून

२ दिवसांच्या आत भरणे अनिवार्य आहे. संस्था/ व्यक्ती सुरक्षा ठेव रक्कम कार्यालयाकडे वेळेत जमा करण्यास असमर्थ ठरल्यास त्याला अपात्र ठरवून त्याची इसारा रक्कम जप्त करण्यात येईल.

९. ज्या संस्थेची / व्यक्तीची ई-लिलाव बोली सर्वात जास्त असेल अशा संस्थेची / व्यक्तीची लिलाव विक्रीची उच्चतम बोली स्विकारण्यात येईल. त्या संस्थेने / व्यक्तीने अधिदान व लेखा कार्यालयाकडे लिलावाची पुर्ण रकम एकरकमी राष्ट्रीयीकृत बॅकेंच्या धनाकर्षाद्वारे (Demand Draft) भरणा करणे अनिवार्य आहे. लिलाव रकमेचा एकरकमी भरणा केल्यानंतर पुढील ७२ तासांच्या आत विक्री केलेले वाहन स्वखर्चाने अधिदान व लेखा कार्यालयाच्या आवारातुन उचलून नेणे आवश्यक आहे.

१०. लिलावाने विक्री करावयाचे वाहन जेथे आहे व ज्या अवस्थेमध्ये आहे त्या अवस्थेमध्ये ताब्यात घ्यावे लागेल. वाहनाच्या अवस्थेमध्ये कोणताही बदल अधिदान व लेखा कार्यालयाकडून केला जाणार नाही.

११. प्रादेशिक परिवहन कार्यालयाशी संबंधित सदर वाहनाचा कोणताही खर्च सदर संस्थेस/व्यक्तीस करावा लागेल. हे कार्यालय याबाबतचा कोणताही खर्च करणार नाही. तसेच प्रादेशिक परिवहन कार्यालयाशी संबधित आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता देखील संबंधित व्यक्ती / संस्थेनेच करावयाची आहे.

१२. विक्री केलेले वाहन कार्यालयाच्या आवारातून नेणेचे कार्यवाही दरम्यान संपुर्ण व सर्व प्रकारचा खर्च ठेकेदारास स्वखर्चाने करावा लागेल. त्याबाबत कोणताही खर्च कार्यालयाकडून केला जाणार नाही.

१३. ठेका मंजुर केलेल्या संस्थेने वाहन उचलण्याचे काम कार्यालयीन वेळेत म्हणजे सकाळी ११.०० ते सायंकाळी ४.०० पर्यंत साप्ताहिक / सार्वजनिक सुट्या वगळून कामकाजाच्या दिवशी करावयाचे आहे.

१४. लिलावाने विक्री केलेले वाहन कंत्राटदाराने ताब्यात घेतल्यानंतर कार्यालयाच्या आवाराबाहेर नेताना कार्यालयाच्या इमारतीचे / आवारातील कोणत्याही साहित्याचे कोणतेही नुकसान झाल्यास त्याची भरपाई ठेकेदाराकडून त्याच ठिकाणी (on the spot) रोखीच्या स्वरुपात वसुल करण्यात येईल व याबाबत ठेकेदारास बाजू मांडण्याची कोणतीही संधी दिली जाणार नाही.

१५. ई-लिलाव बोली कोणतेही कारण न देता स्विकृत अथवा अस्विकृत करण्याचा तसेच लिलावाची कार्यवाही कोणत्याही ठप्प्यावर थांबविण्याचा अथवा त्यामध्ये कोणताही फेरबदल / सुचना करण्याचा संपुर्ण अधिकार अधिदान व लेखा अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. तसेच याबाबत कोणतीही कारणीमिमांसा केली जाणार नाही.

*** अधिदान व लेखा कार्यालयाचे जुने व निर्लेखित झालेले वाहन याचा ई-लिलाव विक्रीबाबत ई-लिलाव सुचनेमध्ये नमूद केलेल्या वरील सर्व अटी / शर्ती मला पुर्णपणे मान्य आहेत. तसेच सदर अटी आणि शर्तीबाबत माझी कोणतीही तक्रार किंवा हरकत असणार नाही.**

नाव ............................................... स्वाक्षरी व संस्थेचा रबरी शिक्का ............................................

ठिकाण :-
दिनांक :-

# महाराष्ट्र शासन
# अधिदान व लेखा कार्यालय

☎ ०२२ - २६५६६३००
E-mail : pao@mahakosh.in

लेखा कोष भवन, ए विंग
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

**मुल्य रु. १,६००/- (सदर शुल्क ना-परतावा आहे)**

अधिदान व लेखा कार्यालयाचे निर्लेखित केलेले वाहन नोंदणी क्र. MH०२PA३८८८ (टाटा ४०७ कॅश व्हॅन) याची ई-लिलाव पध्दतीतील विहीत नमुना

**प्रपत्र 'अ'**

| | |
|---|---|
| संस्थेचे / व्यक्तीचे नाव | |
| संस्थेचा पत्ता/व्यक्तीचा पत्ता<br>व मोबाईल क्रमांक | |
| आधार कार्ड / पॅन कार्ड क्रमांक | |
| ई-लिलाव सुचनेतील अटीनुसार निविदा नमुना शुल्क व इसारा रकमेच्या धनाकर्षाचा तपशील | बँकेचे नाव धनाकर्ष क्र. व दि. रक्कम |

अधिदान व लेखा कार्यालयाचे निर्लेखित केलेले वाहन ताब्यात घेण्यासाठीच्या ई-लिलाव सूचनेत नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत. तसेच याबाबत माझी कोणतीही तक्रार नाही. प्रपत्र-अ मध्ये नमुद केलेली सर्व माहिती सत्य आहे.

नाव ................................................ संस्थेची / व्यक्तीची स्वाक्षरी ...........................................

(संस्थेच्या कार्यालयाचा रबरी शिक्का पदनाम व संपुर्ण पत्त्यासहीत)